दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आजचे पंचांग

दिनांक: ४ नोव्हेंबर २०२६ (बुधवार) माह (अमावस्यांत): आश्विन माह (पूर्णिमांत): कार्तिक ऋतु: हेमंत आयन: दक्षिणायन पक्ष: कृष्ण पक्ष तिथी: दशमी तिथी (सकाळी ११:०३ पर्यंत), त्यानंतर एकादशी तिथी नक्षत्र: पूर्वा फाल्गुनी नक्षत्र (५ नोव्हेंबर पहाटे ०३:२९ पर्यंत), त्यानंतर उत्तरा फाल्गुनी नक्षत्र योग: ब्रह्म योग (सकाळी ०८:०० पर्यंत), त्यानंतर इंद्र योग करण: विस्ती भद्रा करण (सकाळी ११:०३ पर्यंत), त्यानंतर भाव करण चंद्र राशी: सिंह राशी सूर्य राशी: तूळ राशी सूर्योदय: सकाळी ०६:४१ सूर्यास्त: सायंकाळी ०६:०३

विमानातील आपत्कालीन दरवाजा उघडण्याचा प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

दिल्ली ते पुणे विमान प्रवासादरम्यान विमानातून आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी एकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आणल्या प्रकरणी विमान प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत खासगी विमान कंपनीतील कर्मचारी ओंकार विनोद कुलकर्णी (वय २८) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ४१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

रशियात पळवलेल्या मुलाला परत आणा, हा सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न: केंद्र सरकारला कठोर निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / प्रतिनिधी

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या ताब्यात असलेल्या पाच वर्षांच्या मुलाला त्याची रशियन आई नेपाळमार्गे बेकायदेशीरपणे रशियात घेऊन गेल्याच्या गंभीर घटनेची सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कठोर दखल घेतली आहे. ''हा केवळ एका मुलाचा प्रश्न नसून, या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिष्ठेचा आणि अखंडतेचा विषय आहे,'' अशा शब्दांत न्यायालयाने केंद्र सरकारची कानउघाडणी केली असून, कोणत्याही परिस्थितीत मुलाला तात्काळ भारतात परत आणून न्यायालयासमोर हजर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने या प्रकरणात परराष्ट्र मंत्रालय आणि केंद्र सरकारच्या कायदेशीर यंत्रणेला संपूर्ण ताकद पणाला लावण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायालयाच्या ताब्यातून बेकायदेशीर अपहरण

रशियन नागरिक असलेली आई आणि भारतीय वंशाचे वडील यांच्यात मुलाच्या ताब्यावरून (Custody) दीर्घकाळापासून कायदेशीर वाद सुरू होता. सर्वोच्च न्यायालयाने मुलाचा ताबा कायदेशीररित्या स्वतःच्या देखरेखीखाली घेतला होता आणि आई-वडिलांना संयुक्त ताबा दिला होता.

मात्र, जुलै २०२५ मध्ये आईने न्यायालयाच्या आदेशांचे आणि परवानगीचे उघड उल्लंघन करत नेपाळच्या मार्गाने मुलाला रशियात पळवून नेले.

व्हिडिओ कॉलचा प्रस्ताव न्यायालयाने फेटाळला

भारत आणि रशियन सरकारांच्या परराष्ट्र मंत्रालयांमध्ये झालेल्या चर्चेनंतर, मुलाचा आणि भारतातील वडिलांचा केवळ व्हिडिओ कॉलद्वारे संवाद घडवून आणण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता.

परंतु, सर्वोच्च न्यायालयाने हा प्रस्ताव पूर्णपणे फेटाळून लावला. ''इथे कोणत्याही प्रकारचा व्हिडिओ कॉल चालणार नाही. भारताच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेच्या ताब्यातून मुलाला पळवून नेऊन देशाच्या न्यायव्यवस्थेला थेट आव्हान देण्यात आले आहे,'' असे खंडपीठाने अत्यंत स्पष्ट शब्दांत बजावले.

राजकीय व राजनैतिक पातळीवर तातडीने कारवाईचे आदेश

न्यायालयाने या प्रकरणी भारताचे महान्यायवादी (Attorney General), सॉलिसिटर जनरल (Solicitor General) आणि सर्व अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांना वैयक्तिकरित्या लक्ष घालण्याचे निर्देश दिले आहेत. राजनैतिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व आवश्यक पावले उचलून मुलाला तात्काळ शोधण्याचे आदेश सरकारने पाळावेत, असे न्यायालयाने म्हटले आहे.

सुनावणीदरम्यान, रशियन दूतावासातील काही अधिकाऱ्यांच्या मदतीने खोट्या कागदपत्रांच्या आधारे मुलाला देशाबाहेर पळवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यावर न्यायालयाने स्पष्ट केले की, न्यायालयाने यापूर्वी दाखवलेल्या सहानुभूतीचा आणि उदारतेचा गैरफायदा कोणालाही घेता येणार नाही.

या आंतरराष्ट्रीय प्रकरणाची पुढील महत्त्वाची सुनावणी नोव्हेंबर २०२६ च्या अखेरीस निश्चित करण्यात आली असून, केंद्र सरकारकडून ठोस कायदेशीर पावलांची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

आंदोलन करा, पण सार्वजनिक जागा बापजाद्यांची समजू नका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आहे; मात्र सार्वजनिक जागा अनिश्चित काळासाठी ताब्यात ठेवण्याचा परवाना नाही, अशा स्पष्ट शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने आंदोलनांच्या नावाखाली सार्वजनिक ठिकाणांवर होणाऱ्या अतिक्रमणावर बोट ठेवले आहे. जंतरमंतर आणि रामलीला मैदानावरील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणांमुळे आंदोलनाचा अधिकार विरुद्ध नागरिकांचे आर्थिक हित हा वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील निदर्शनांमुळे दिल्लीतील व्यापाऱ्यांचे



नुकसान झाल्याचा दावा करणाऱ्या व्यापारी संघटनांच्या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी जंतरमंतरचा आंदोलनांसाठी असलेला अधिकृत दर्जा काढून घेतल्याची माहिती दिली. रामलीला मैदानासह तीन पर्यायी जागा निश्चित केल्याचेही त्यांनी सांगितले. २० जुलैच्या आंदोलनासाठी एका दिवसाची परवानगी असतानाही आंदोलकांनी जागा रिकामी केली नाही आणि संसदेच्या दिशेने मोर्चा काढल्याचा दावा त्यांनी केला.

व्यापाऱ्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी दिवाळीच्या काळात आंदोलनांमुळे विक्री घटल्याने मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगितले. पुढील दोन महिने आंदोलनांवर निर्बंध घालण्याची मागणीही त्यांनी केली.

मात्र, न्यायालयाने केवळ व्यापाऱ्यांचे नुकसान हा एकमेव निकष असू शकत नसल्याचे अधोरेखित केले. शेतकरी, वकील आणि अन्य घटकांनी आंदोलन कुठे करायचे, असा सवाल उपस्थित केला.

आंदोलनकर्त्यांना जबाबदारीची जाणीव हवीच; पण आंदोलनाचा आवाजच दाबला जाणार नाही, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आता या प्रकरणात न्यायालय कोणता तोडगा काढते, हे पाहावे लागेल.

आश्वासनांचा पाऊस, शेतकऱ्यांच्या पदरात किती मदत?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे / प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शेतकरी दुष्काळाच्या झळांनी होरपळत असताना केंद्र सरकारने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली आहे. मात्र, आश्वासनांच्या पलीकडे शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष किती मदत पडणार, हा प्रश्न कायम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच हजार रुपयांच्या अग्रिम मदतीवरून टीका करणाऱ्या विरोधकांना लक्ष्य केले.

पुणे मेट्रो मार्गिका-३ च्या लोकार्पण आणि दुसऱ्या टप्प्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात मोदी बोलत होते. महाराष्ट्रातील



प्रतिकूल हवामानामुळे शेतकरी कुटुंबे संकटात सापडल्याची जाणीव केंद्र सरकारला आहे. राज्य सरकारने अग्रिम मदत दिली असून, पंतप्रधान किसान सन्मान निधीची रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली आहे. नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार एकत्रित प्रयत्न करेल, असे मोदी म्हणाले.

शेतकऱ्यांच्या घरातही दिवाळी साजरी झाली पाहिजे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. मात्र, दुष्काळामुळे उद्ध्वस्त झालेल्या पिकांचे नुकसान, रब्बी हंगामाचे संकट आणि वाढता उत्पादन खर्च पाहता केवळ आश्वासनांनी शेतकऱ्यांची दिवाळी उजळणार आहे का, हा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधताना मोठ्या गाड्यांतून फिरणाऱ्यांना पाच हजार रुपयांचे महत्त्व कळणार नाही, असा टोला लगावला. ही अग्रिम मदत असून पुढेही मदत सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. मागील सरकारांनी शेतकऱ्यांना पुरेशी मदत केली नाही, असा आरोपही त्यांनी केला.

आता घोषणांचे रूपांतर प्रत्यक्ष मदतीत कधी होणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष आहे.

इंजिनिअरिंग प्रवेशाचा बाजार? २५ लाखांत जागा मिळत असल्याचा आरोप!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

गुणांच्या जोरावर प्रवेश मिळवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी पैशांचा खेळ सुरू आहे का? महाराष्ट्रातील सीईटी प्रवेश प्रक्रियेत टॉप इंजिनिअरिंग महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी तब्बल २५ लाख रुपयांची मागणी होत असल्याचा गंभीर आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांनी सादर केलेल्या कथित स्टिंग ऑपरेशनमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या राजीनाम्याची मागणीही पुढे आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सीईटी परीक्षेतील कथित डेटा गळती आणि प्रवेश प्रक्रियेतील गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केला. या प्रकरणाची तक्रार करण्यात आल्यानंतर सरकारने विशेष तपास पथकाची नियुक्ती केली. मात्र, तपासात ठोस प्रगती होत नसल्याचा आरोप पवार यांनी केला.

यावेळी त्यांनी स्टिंग ऑपरेशनमधील चित्रफीत दाखवली. शिक्षक नारायण शिंगारे यांनी कथित गैरप्रकारांबाबत माहिती दिल्याचे पवार यांनी सांगितले. नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी २५ लाख रुपये मागितले जात असल्याचा दावा या चित्रफितीत करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणात स्थानिक पोलीस ठाणे आणि विशेष तपास पथकाकडे जाऊनही गुन्हा दाखल झाला नसल्याचे शिंगारे यांनी सांगितल्याचा दावा आहे. त्यामुळे तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, काही शिक्षकांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मात्र, स्टिंग ऑपरेशनमधील आरोप, कथित आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांची स्वतंत्र तपासणी होणे आवश्यक आहे.

दिल्ली-पुणे इंडिगो विमानात खळबळ; प्रवाशाची इमर्जन्सी एग्झिट दरवाजाशी छेडछाड

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे / प्रतिनिधी

दिल्लीहून पुण्याकडे जाणाऱ्या इंडिगोच्याविमानामध्ये एका प्रवाशाने उड्डाणादरम्यान इमर्जन्सी एग्झिटच्या यंत्रणेशी छेडछाड केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे हवेतच विमानाचा अलार्म वाजू लागल्याने प्रवाशांमध्ये काही काळ मोठी भीतीचे वातावरण निर्माण झालं होतं. सोमवारी मध्यरात्री ही घटना घडली असून, याप्रकरणी पोलिसांनी ३३ वर्षीय प्रवाशाला नोटीस बजावली आहे.

दिल्लीहून पुण्याला जाणाऱ्या इंडिगोच्या ६ए६८८४ या विमानाने सोमवारी मध्यरात्री १२:४५ वाजता दिल्लीतून उड्डाण केले आणि पहाटे २:०० वाजता हे विमान पुण्यात उतरले. विमान हवेत असताना, इमर्जन्सी एक्झिटजवळ बसलेल्या गौरव सत्येंद्र रौतेला (३३) या प्रवाशाने इमर्जन्सी दरवाजाच्या लिव्हरवरील कव्हरशी छेडछाड केली. प्रवाशाने अचानक दरवाजाच्या कव्हरला हात लावल्यामुळे विमानाची इमर्जन्सी अलर्ट सिस्टीम सुरु झाली आणि अचानक अलार्म वाजू लागला. आवाज ऐकून विमानातील प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. पोलिसांच्या चौकशीदरम्यान आरोपी प्रवाशाने सांगितले की, ते कव्हर नेमके कशाचे आहे हे पाहण्यासाठी आपण कुतूहलापोटी त्याला हात लावला होता. तो आपत्कालीन दरवाजाशी कनेक्ट आहे, याची कोणतीही कल्पना नव्हती, असा दावा त्याने केला. विमान लँड झाल्यानंतर विमानातील क्रू मेंबरच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी प्रवाशाविरुद्ध कडक कारवाई केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाची बीएमसी प्रशासनाला चपराक : बोरीवलीतील अतिक्रमणप्रकरणी आयुक्तांचे वेतन रोखण्याचे आदेश; ५ लाखांचा दंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : वृत्तसंस्था

मुंबईतील बोरीवली येथील बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (BEST) उपक्रमाच्या बसस्थानकाच्या जागेवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्यात अपयशी ठरल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) प्रशासनाला अत्यंत कडक शब्दांत फटकारले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या प्रकरणी कठोर कायदेशीर पावले उचलत बीएमसी आयुक्तांचे मासिक वेतन तात्काळ रोखण्याचे आदेश जारी केले आहेत. यासोबतच न्यायालयाने महानगरपालिकेवर ५ लाख रुपयांचा दंड (Cost) ठोठावला असून आयुक्तांना अवमानाची (Contempt of CouA°t) नोटीस बजावली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे कडक ताशेरे आणि कारवाई

न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार, जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशांची पूर्ण अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत महापालिका आयुक्त आणि त्यांच्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांचे (PeA°sonal Staff) मासिक वेतन रोखण्याचे स्पष्ट निर्देश बीएमसी व महाराष्ट्र सरकारला देण्यात आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी १३ नोव्हेंबर २०२५ आणि २८ जुलै २०२६ रोजी या अतिक्रमणांवर कारवाई करण्यासाठी कालबद्ध मुदत दिली होती. मात्र, या निर्देशांचे उघडपणे उल्लंघन झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. अतिक्रमणे हटवण्यासाठी आणखी ३० दिवसांची मुदत देण्याची बीएमसीची विनंती न्यायालयाने फेटाळून लावली.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महापालिकेचे अधिकारी अतिक्रमण करणाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांच्याकडून अनधिकृतपणे वसुली (हप्ता) करत असल्याचा संशय न्यायालयाने व्यक्त केला. ''आम्ही आयुक्तांना तुरुंगात पाठवू, तेव्हाच त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची भाषा समजेल,'' अशा अत्यंत तीव्र शब्दांत सरन्यायाधीशांनी प्रशासकीय दिरंगाईवर ताशेरे ओढले.

मराठी भाषेचे अजब कारण फेटाळले

सुनावणीदरम्यान महापालिकेच्या वकिलांनी कारवाईतील विलंबाचे समर्थन करताना एक अजब कारण मांडले. संबंधित अधिकारी डॉ. प्रफुल्ल दिनेश तांबे यांना मराठी भाषा येत नसल्यामुळे कागदपत्रांच्या इंग्रजी भाषांतरासाठी वेळ लागला, असा युक्तिवाद करण्यात आला.

मात्र, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांनी हा युक्तिवाद तात्काळ फेटाळून लावत तीव्र आश्चर्य व्यक्त केले. ''मुंबईत राहून 'तांबे' अडनाव असलेल्या अधिकाऱ्याला मराठी येत नाही, यावर कसा विश्वास ठेवायचा?'' असा थेट सवाल करत न्यायालयाने प्रशासकीय बचावातील फोलपणा उघडा पाडला.

प्रकरणाची पार्श्वभूमी

बोरीवली येथील सुमारे ७,८०० चौरस मीटर जमिनीपैकी ३,४०० चौरस मीटर जागा बेस्ट बसस्थानक आणि प्रशासकीय इमारतीसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. संबंधित विकासक (दुबे कन्स्ट्रक्शन्स) आणि महानगरपालिका यांच्यातील जुन्या कायदेशीर वादात या जागेवरील अतिक्रमणे हटवून जमीन मोकळी करण्याची मुख्य जबाबदारी बीएमसीवर सोपवण्यात आली होती.

मात्र, प्रशासकीय स्तरावर जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आयएएस (खअड) अधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी निश्चित करत हा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. प्रशासकीय उत्तरदायित्व आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाची ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

संपादकीय

गुजरात मॉडेल'च्या विकासाच्या दाव्यांमागील शैक्षणिक वास्तव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ देशासमोर विकासाचा सर्वोत्कृष्ट मापदंड म्हणून सादर करण्यात आलेले 'गुजरात मॉडेल' सध्या राज्यातील सरकारी शाळांच्या दरावस्थेमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका मीडिया वृत्तानुसार, गुजरातच्या ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षणाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी तफावत उघड झाली आहे, ज्यामुळे भव्य विकास आराखडे आणि जमिनीवरील वास्तव यातील अंतर स्पष्ट होते.

पायाभूत सुविधांची बिकट स्थिती

या विशेष शोध अहवालातील आकडेवारीनुसार, गुजरातमध्ये ७,५९९ सरकारी शाळा आजही पत्र्यांच्या शेडमध्ये (टीन शेड) सुरू आहेत. आधुनिक डिजिटल शाळांचे दावे केले जात असताना, १०५ शाळांमध्ये साधे शौचालयदेखील नाही, आणि ५,००० हून अधिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नाही. जागतिक बँक आणि आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या सहकार्याने राबवल्या जाणाऱ्या १०,००० कोटींच्या 'मिशन स्कूल्स ऑफ एक्सलन्स' प्रकल्पाच्या उद्घोषणेनंतरही ही मूलभूत तफावत कायम आहे.

शाळांच्या दुरावस्थेची टक्केवारीनुसार माहिती खालीलप्रमाणे आहे:

* २२% शाळांमध्ये छताचे पत्रे अत्यंत खराब किंवा तुटलेल्या अवस्थेत आहेत.
* १४% शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खेळाचे कोणतेही मैदान नाही.
* ७% शाळांच्या खोल्यांची इमारती अधिकृतपणे जर्जर किंवा धोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत.
* ५% शाळा संपूर्ण राज्यात केवळ एकाच शिक्षकाच्या भरवशावर चालवल्या जात आहेत.

अब्जावधींचे बजेट आणि अंमलबजावणीतील त्रुटी

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात गुजरातच्या शिक्षण विभागाला ४,०८,०७३ कोटींची भरघोस तरतूद करण्यात आली आहे, जी एकूण अर्थसंकल्पाच्या १५.४८% एवढी मोठी आहे. तरीही विधानसभा आणि संसदेत सादर होणारी आकडेवारी ही प्रत्यक्ष परिस्थिती व्यवस्थापकीय अपयशाकडे बोट दाखवणारी ठरते.

या ग्राउंड रिपोर्टमधील काही ठळक उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत:

१. नसवाडी तालुका: येथील एका प्राथमिक आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांमार्फत एका शेतकऱ्याच्या घरात शिकवले जात आहे, कारण नव्या इमारतीची निविदा प्रक्रिया प्रशासकीय दिरंगाईमुळे रखडली आहे.

२. खिंसरा ग्रामपंचायत: ९वी आणि १०वीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग १९८२ पासून तात्पुरत्या खोल्यांमध्ये भरवले जात आहेत. स्थानिक दात्याने जागा देऊनही सरकारी मंजुरीअभावी बांधकाम सुरू झालेले नाही.

३. खानपुर तालुका: दर्यापुरा प्राथमिक शाळेत १३८ मुले जर्जर इमारतीत शिकत असून, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

प्रशासनाचा सुरक्षात्मक वळसा आणि निष्कर्ष

पायाभूत सुविधा सुधारण्याऐवजी प्रशासनाकडून वेगळ्याच उपाययोजनांवर भर दिला जात असल्याचे दिसते. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी गुजरात सरकारने एक परिपत्रक जारी करून सरकारी शाळांमध्ये बाहेरील लोकांच्या प्रवेशावर बंदी घातली. यासाठी विद्यार्थ्यांची गोपनीयता आणि पॉक्सो (POCSO) कायद्याचा दाखला देण्यात आला असला, तरी विरोधकांच्या मते शाळांची दुरवस्था लपवण्यासाठी हा प्रयत्न केला गेला आहे. असाच निर्णय राजस्थान सरकारने ऑगस्ट २०२६ मध्ये घेतला होता.

दुसरीकडे, केंद्र सरकारच्या अधिकृत 'युडायस प्लस' (UDISE+) अहवालानुसार, गुजरातचा माध्यमिक शाळांमधील गळतीचा दर (Dropout Rate) १२.७% वर पोहोचला आहे, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा कितीतरी जास्त आहे. भौतिक पायाभूत सुविधा, स्वच्छ पाणी, आणि पुरेशा शिक्षकांची कमतरता जोपर्यंत दूर केली जात नाही, तोपर्यंत केवळ कागदावरील आर्थिक तरतुदींमधून शाश्वत मानवी विकास साधणे कठीण आहे, हेच या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या विकासाला मिळाली नवी गती : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिका-३चे लोकार्पण; पुणे मेट्रो टप्पा-२ मधील चार नव्या मार्गांचे भूमिपूजन



■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासह आयटी क्षेत्र आणि शहराच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी मेट्रोचे जाळे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवा सुरू झाल्यामुळे पुण्यातील आयटी क्षेत्राला थेट कनेक्टिव्हिटी मिळणार असून शहराच्या जुन्या आणि नव्या भागांमधील संपर्क अधिक मजबूत होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिका-३च्या लोकार्पणासह पुणे मेट्रो टप्पा-२ मधील चार विस्तारित मार्गांचे भूमिपूजन प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, खासदार श्रीरंग बारणे आदी उपस्थित होते.

पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल, फार्मा, स्टार्टअप, नवोपक्रम आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र आहे. मेट्रोच्या विस्तारामुळे या क्षेत्रांना अधिक चांगली वाहतूक सुविधा मिळून आर्थिक विकासाला चालना मिळेल, असे प्रधानमंत्री म्हणाले. २०१४ मध्ये देशात केवळ २४८ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यरत होते. आता हे जाळे सुमारे १२०० किलोमीटरपर्यंत विस्तारले असून २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू आहे. दररोज एक कोटीहून अधिक प्रवासी मेट्रोचा वापर करतात, असे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रात २०१४ मध्ये केवळ १० ते ११ किलोमीटर मेट्रो मार्ग सुरू होता. आता सुमारे २०० किलोमीटर मार्ग सेवेत असून ६८० किलोमीटरहून अधिक मार्गांची कामे सुरू आहेत. राज्यात मेट्रो पायाभूत सुविधांसाठी अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली आहे. मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचण्याबरोबरच शहरांची उत्पादकता आणि अर्थव्यवस्थाही वाढते, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील प्रतिकूल हवामानामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार उभे असल्याची ग्वाहीही प्रधानमंत्री मोदी यांनी दिली. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या दिवाळीत आनंद निर्माण करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

पुणे मेट्रोचे जाळे ५५ किलोमीटरपर्यंत विस्तारणार : मुरलीधर मोहोळ

हिंजवडी ते शिवाजीनगर या २३ किलोमीटरच्या मार्गामुळे पुणे मेट्रोचे जाळे ५५ किलोमीटरपर्यंत विस्तारणार असून आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि लाखो नागरिकांना त्याचा लाभ होईल, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. सप्टेंबर महिन्यात पुणेकरांनी मेट्रोतून नऊ लाख ५८ हजार ६०३ प्रवास केले. खडकवासला-खराडी, वनाज-चांदणी चौक, रामवाडी-वाघोली आणि मानिकबाग-नळस्टॉप या सुमारे ४६ किलोमीटरच्या नव्या मार्गांमुळे शहराच्या पूर्व, पश्चिम आणि दक्षिण भागांची जोडणी अधिक सक्षम होईल. मेट्रो विस्तारासोबत पीएमपीच्या ताफ्यात नव्या बस, रिंगरोड आणि भूमिगत रस्त्यांच्या विकासावरही भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी आणि पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल कुमार सैनी उपस्थित होते.

मेट्रो मार्गिका-३ची ठळक वैशिष्ट्ये

* मार्ग : माण-हिंजवडी ते शिवाजीनगर.
* लांबी : २३.२०३ किलोमीटर.
* स्थानके : २३ उन्नत स्थानके.
* प्रकल्प खर्च : ८ हजार ३१३ कोटी रुपये.
* उभारणी : पीपीपी-डीबीएफओटी तत्त्वावर देशातील पहिला मेट्रो प्रकल्प.
* महिला सहभाग : सुमारे १०० महिला ट्रेन पायलट; स्थानकांवरील ५० टक्के कर्मचारी महिला.
* मुख्य लाभ : हिंजवडी आयटी पार्कला शिवाजीनगरशी थेट जोडणी.

२०३० पर्यंत पुणे देशातील महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल : मुख्यमंत्री

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेशात मेट्रो, इलेक्ट्रिक बस, इनर व आउटर रिंगरोड, बोगदे आणि विमानतळ अशा आधुनिक वाहतूक सुविधांचे जाळे उभारण्यात येत आहे. या माध्यमातून २०३० पर्यंत पुणे महानगर प्रदेश देशातील महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. हिंजवडी हे देशातील महत्त्वाचे आयटी केंद्र असून येथे दररोज हजारो कर्मचारी कामासाठी येतात. वाहतूक कोंडीमुळे त्यांना एक ते दोन तास अडकून पडावे लागते. मेट्रो सुरू झाल्यामुळे आयटी क्षेत्रातील कर्मचारी, विशेषतः तरुणांना मोठा दिलासा मिळेल, असे मुख्यमंत्री म्हणाले. शिवाजीनगर-हिंजवडी हा सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारण्यात आलेला देशातील पहिला मेट्रो प्रकल्प आहे. टाटा प्रोजेक्ट्स आणि सीमेन्स यांनी डीबीओटी तत्त्वावर त्याची उभारणी केली. या प्रकल्पात महिलांचे योगदान महत्त्वाचे असून ही 'पिंक पॉवर्ड' मेट्रो महिला सक्षमीकरणाचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे मेट्रो ग्रीन मेट्रो म्हणून विकसित होत असून आवश्यक ऊर्जेपैकी ३० टक्के ऊर्जा स्वतः निर्माण करण्याचे नियोजन आहे. केंद्र सरकारने पुणे महानगर प्रदेशाच्या शहरी विकासासाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून आधुनिक वाहतूक सुविधा विकसित केल्या जातील, असेही त्यांनी नमूद केले.

मेट्रोमुळे पुणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका : एकनाथ शिंदे

मेट्रो मार्गिका-३ पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला कलाटणी देणारा प्रकल्प ठरेल. नागरिकाचा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी होण्यासह वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुणेकरांना मेट्रोची भेट मिळत असून दिलेला शब्द पाळून प्रकल्प पूर्ण करण्यावर सरकारने भर दिला आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत पीएमआरडीए, महामेट्रो, टाटा प्रोजेक्ट्स, सीमेन्स आणि संबंधित अधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग, मिसिंग लिंक आणि पुण्याभोवतीचा रिंगरोड यांसारख्या प्रकल्पांमुळे भविष्यात वाहतूक कोंडी कमी होईल. आतापर्यंत ९० लाखाहून अधिक प्रवाशांनी पुणे मेट्रोचा वापर केला असून सार्वजनिक वाहतुकीला नागरिकांचा प्रतिसाद वाढत असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. पुण्याच्या विकासात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदानाचाही त्यांनी विशेष उल्लेख केला.

पुणे मेट्रो मार्गिका-३ महिला संचालित मेट्रो ठरणार : सुनेत्रा पवार

पुणे मेट्रो मार्गिका-३ ही देशातील सार्वजनिक-खासगी भागीदारीतून साकारलेली पहिली मेट्रो मार्गिका असून, सुमारे आठ हजार ३१३ कोटी रुपये खर्चून ती उभारण्यात आली आहे. या मार्गिकेचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्या संचालनात महिलांना मोठ्या प्रमाणावर संधी देण्यात आली आहे. सुमारे १०० महिला ट्रेन पायलट आणि स्थानकांवरील ५० टक्के महिला कर्मचारी या मार्गिकेच्या संचालनात सहभागी होणार आहेत. त्यामुळे ही देशातील पहिली १०० टक्के महिला संचालित मेट्रो ठरेल, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. पुणे मेट्रो टप्पा-२ अंतर्गत ३१ किलोमीटर लांबीच्या आणि २८ स्थानकांच्या चार विस्तारित मार्गांना केंद्र सरकारने सुमारे नऊ हजार ८५८ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या विस्तारामुळे वनाज-चांदणी चौक, रामवाडी-विठ्ठलवाडी, कोथरूड, बावधन, विमाननगर, खराडी आणि वाघोली या भागांना मेट्रोची जोडणी मिळणार आहे. सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे मेट्रोचे जाळे १०० किलोमीटरपेक्षा अधिक होईल. हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरातील पायाभूत सुविधांच्या प्रश्नांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे. मेट्रो स्थानकांपर्यंत पोहोचणाऱ्या अंतर्गत रस्त्यांच्या ४२६ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून, त्याकडे आपण लक्ष देणार असल्याचे त्यांनी सांगितले. मेट्रो प्रकल्पाच्या नियोजनापासून निधी उपलब्धतेपर्यंत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे योगदान महत्त्वाचे होते, असेही त्यांनी नमूद केले.

शगुन चौकात मध्यरात्री दोन पूजा साहित्याच्या दुकानांना आग; दोन अग्निशमन जवान जखमी

चार अग्निशमन केंद्रांच्या जवानांची धाव; तत्पर कारवाईमुळे लगतची दुकाने बचावली, जीवितहानी टळली

■ पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी येथील शगुन चौक परिसरात मध्यरात्री दोन पूजा साहित्याच्या दुकानांना आग लागल्याची घटना घडली. मंगळवारी (दि. ३) रात्री १२.४९ वाजता आगीची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. चार अग्निशमन केंद्रांतील जवानांनी संयुक्तपणे केलेल्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. आगीत दोन्ही दुकानांतील साहित्याचे नुकसान झाले. मात्र, आग इतर दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. या कारवाईत दोन अग्निशमन जवान किरकोळ जखमी झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

आगीची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्रासह नेहरूनगर, थेरगाव आणि रहाटणी अग्निशमन केंद्रांतील वाहने तातडीने रवाना करण्यात आली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर जवानांनी दोन्ही दुकानांमध्ये कोणी अडकले नसल्याची खातरजमा केली. त्यानंतर विविध दिशांनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविले.

दोन्ही दुकानांमध्ये पूजा साहित्य आणि इतर वस्तूंचा मोठा साठा असल्याने आगीत त्यांचे नुकसान झाले. मात्र, अग्निशमन दलाच्या जलद कारवाईमुळे आग शेजारील दुकानांपर्यंत पोहोचली नाही.

आग विझविताना फायरमन प्रणय शिर्के आणि फायरमन आदिल गोडे हे दोन जवान किरकोळ जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, लीडिंग फायरमन विजय घुगे तसेच विविध अग्निशमन केंद्रांतील जवान आणि कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

जवानांची कर्तव्यतत्परता कौतुकास्पद : आयुक्त

नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण करणे हे अग्निशमन दलाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शगुन चौकातील आगीच्या घटनेत जवानांनी तत्परतेने आणि समन्वयाने काम केल्यामुळे आग लगतच्या दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखता आली. जखमी जवानांना तातडीने उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कर्तव्य बजावणाऱ्या जवानांची कर्तव्यतत्परता कौतुकास्पद आहे, अशी प्रतिक्रिया महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

दरम्यान, आग लागल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाच्या १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.



कमी वजन, जादा दरवसुली अन् पावती देण्यास टाळाटाळ; अदिती भारत गॅस एजन्सीविरोधात तक्रार

दोन किलो गॅस कमी असल्याचा ग्राहकाचा दावा; ९४५ रुपयांच्या सिलेंडरसाठी १,००० रुपये वसुलीचा आरोप

■ पिंपरी : प्रतिनिधी

घरगुती गॅस सिलेंडरच्या वितरणात निर्धारित वजनापेक्षा कमी गॅस, अधिकृत दरापेक्षा जादा वसुली आणि पावती देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप काळेवाडी येथील अदिती भारत गॅस एजन्सीवर करण्यात आला आहे. याप्रकरणी एका ग्राहकाने भारत गॅस कंपनी आणि ग्राहक मंचाकडे तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

संबंधित ग्राहकाच्या म्हणण्यानुसार, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजता एजन्सीच्या गोदामात सिलेंडरचे वजन केले असता निर्धारित वजनापेक्षा दोन किलो गॅस कमी असल्याचे आढळले. तसेच सिलेंडरची किंमत ९४५ रुपये असताना वितरण कर्मचाऱ्यांकडून १,००० रुपये घेतले जात असल्याचा आरोपही ग्राहकाने केला आहे. अतिरिक्त रक्कम आणि पावतीबाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तर देण्याऐवजी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

प्रकाराचे पुरावे सादर करून ग्राहकाने संबंधित कंपनी आणि ग्राहक मंचाकडे दाद मागितली आहे. तसेच एजन्सीविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची तयारी दर्शवली आहे. मात्र, या आरोपांबाबत एजन्सीची अधिकृत बाजू अद्याप समोर आलेली नाही.

दरम्यान, घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यावसायिक सिलेंडरमध्ये अवैधरीत्या गॅस भरण्याच्या तक्रारीही यापूर्वी समोर आल्या आहेत. त्यातच ३१ ऑक्टोबर रोजी काळेवाडी-वाकड-थेरगाव परिसरातील एका घरात सिलेंडरचा स्फोट झाल्याची घटना घडल्याने गॅस वितरण आणि साठवणुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



या पार्श्वभूमीवर जिल्हा पुरवठा विभाग, भारत गॅस कंपनी आणि वैधमापनशास्त्र विभागाने संयुक्तपणे अचानक तपासणी करण्याची मागणी होत आहे. सिलेंडरचे प्रत्यक्ष वजन, अधिकृत विक्रीदर, पावती वितरण आणि सुरक्षा नियमांचे पालन यांची पडताळणी करण्याची गरज आहे.

ग्राहक पूर्ण पैसे मोजत असताना त्यांना निर्धारित वजनाचा सिलेंडर, अधिकृत दर आणि व्यवहाराची पावती मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे तक्रारीतील आरोपांची निष्पक्ष चौकशी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच आवश्यकतेनुसार पोलिसांत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तक्रारींची दखल घेऊन पुरवठा विभाग आणि भारत गॅस कंपनी अदिती भारत गॅस एजन्सीची तपासणी करणार का? ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण होणार की हा प्रश्न कागदोपत्रीच राहणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

सारांश वृत्त

दिवे येथील ऑटोमेटेड ट्रक आणि रोड सेफ्टी इन्स्टिट्यूटचे काम वेगात

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून पाहणी; कामाचा घेतला आढावा

पुणे : प्रतिनिधी

राज्यातील परिवहन व्यवस्था आधुनिक करण्यासह नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. याच अनुषंगाने परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पुरंदर तालुक्यातील दिवे येथे पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रस्तावित ऑटोमेटेड ड्रायव्हिंग टेस्टिंग ट्रॅक (अद्ढढ) आणि रोड सेफ्टी इन्स्टिट्यूटच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. कामाचा वेग, नियोजन आणि उर्वरित प्रक्रिया यांचा आढावा घेत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. नागरिकांना परिवहन विभागाच्या सुविधा अधिक पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, तसेच वाहनचालकांची चाचणी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घेता यावी, हा या प्रकल्पामागील उद्देश आहे. प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करून त्याचा लाभ नागरिकांना लवकरात लवकर मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

एकरी १३४.८२ टन उसाचे विक्रमी उत्पादन; पारगावच्या लबडे दाम्पत्याची किमया!

एका उसाला ५५ ते ६० कांडे; प्रयोगशील शेती पाहण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील शेतकरी संतोष सखाराम लबडे आणि त्यांच्या पत्नी सरस्वती लबडे यांनी एक एकर आडसाली ऊस शेतीतून तब्बल १३४.८२ टन उत्पादन घेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांच्या शेतातील एका उसाला ७५ ते ६० कांडे असल्याने हा ऊस पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी गर्दी करत आहेत.

संतोष लबडे हे पारगाव येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक, तर सरस्वती लबडे या अवसरी बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका आहेत. अध्यापनाची जबाबदारी सांभाळतानाच त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि शास्त्रीय व्यवस्थापनाच्या जोरावर शेतीतही यशस्वी प्रयोग केला आहे.

लबडे दाम्पत्याने १ जून २०२५ रोजी पारगाव येथील श्री जय हायटेक नर्सरीमधून २६७ जातीची तयार रोपे आणून एक एकर क्षेत्रात लागवड केली. लागवडीपूर्वी जमिनीची आंतरमशागत करून एकरी आठ ट्रॉली शेणखत आणि बेसल डोस देण्यात आला, त्यानंतर ठिबक सिंचनाद्वारे पाणीपुरवठा करत खतांचे आणि पाण्याचे काटेकोर नियोजन केले.



भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे ऊस विकास अधिकारी सोमेश्वर दीक्षित, दिनकर आदक, मुख्य शेतकी अधिकारी दिलीप कुरकुटे, संतोष थोरात आणि सचिन सैद यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. तसेच राजलक्ष्मी ॲग्रोचे संतोष कुल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली औषधांचा योग्य वापर, खत व्यवस्थापन आणि पाणी नियोजन करण्यात आले.

या नियोजनबद्ध शेतीमुळे एकरी सव्वाशे टनांपेक्षा अधिक उत्पादन घेणे शक्य झाल्याचे संतोष लबडे यांनी सांगितले. भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊसतोडणी पूर्ण झाली असून, प्रत्यक्ष वजनात एकरी १३४.८२ टन उत्पादनाची नोंद झाली आहे.

या विक्रमी उत्पादनाची माहिती मिळताच शेतकरी भागचंद पोंदे, कांताराम दातखिळे आणि दिलीप लोखंडे यांनी लबडे यांच्या शेताला भेट दिली. ऊस पिकाची पाहणी करून त्यांनी लबडे दाम्पत्याचे अभिनंदन केले.

आधुनिक तंत्रज्ञान, योग्य मार्गदर्शन आणि काटेकोर व्यवस्थापनाची जोड दिल्यास ऊस शेतीतून भरघोस उत्पादन घेता येते, हे या प्रयोगातून स्पष्ट झाले आहे.

शिक्षण उपसंचालक मच्छिंद्रनाथ कदम यांचा शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार

कनिष्ठ महाविद्यालये आणि शिक्षकांच्या सेवाविषयक प्रश्नांवर सकारात्मक संवादाची अपेक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

पुणे विभागाचे नवनियुक्त शिक्षण उपसंचालक मच्छिंद्रनाथ कदम यांचा पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कदम यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य विक्रम काळे यांनी पुष्पगुच्छ आणि पुस्तक भेट देऊन त्यांचे स्वागत केले.

या भेटीदरम्यान पुणे जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचे विविध प्रश्न, शिक्षकांचे सेवाविषयक प्रश्न आणि प्रशासकीय कामकाज याबाबत चर्चा करण्यात आली. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शिक्षण विभाग आणि शिक्षक संघटना यांच्यात सकारात्मक संवाद व समन्वय राहील, अशी अपेक्षा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी संघटनेचे सरचिटणीस प्रा. हिम्मत तोबरे, उपाध्यक्ष प्रा. बब्रुवाहन घोडके, उपाध्यक्ष प्रा. राजेंद्र निकत, उपप्राचार्य गुंजाळ आणि प्रा. विक्रम चिगरे उपस्थित होते.

टीबीमुक्त महाराष्ट्रासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार; राज्यात ३०० ट्रूनॅट यंत्रे बसविणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार; ४१.९२ कोटींचा प्रकल्प, ग्रामीण भागातही जलद निदान सुविधा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्राला क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागांत क्षयरोगाचे जलद व अचूक निदान करण्यासाठी ३०० अत्याधुनिक 'ट्रूनॅट क्वात्रो' आण्विक निदान यंत्रे बसविण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता असलेल्या या यंत्रांमुळे क्षयरोगाचे निदान अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार आहे.

या प्रकल्पासाठी ४१.९२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, २१ महिन्यांत त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. यासाठी बीपीसीएल फाउंडेशन, एचआयटीईएस-एचएलएल इन्फ्रा टेक सर्व्हिसेस लिमिटेड आणि आरोग्य सेवा संचालनालयातील क्षयरोग व कुष्ठरोग विभागाचे सहसंचालक



यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे.

'ट्रूनॅट क्वात्रो' यंत्राद्वारे अवघ्या एका तासात क्षयरोगासह रिफॅम्पिसिन-प्रतिरोधक क्षयरोगाचे निदान शक्य होणार आहे. ही यंत्रे पोर्टेबल आणि बॅटरीवर चालणारी असल्याने दुर्गम भागांतही त्यांचा वापर करता येईल. यंत्रांच्या वापरासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार असून, निक्षय डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली जाणार आहे.

या उपक्रमामुळे राज्यात दरवर्षी सुमारे ९ लाख ३६ हजार तपासण्या करण्याची क्षमता निर्माण होणार आहे. त्यातून अंदाजे १ लाख १२ हजार क्षयरुग्ण आणि ४ हजार ६८० रिफॅम्पिसिन-प्रतिरोधक क्षयरुग्णांचे लवकर निदान होण्यास मदत होईल. निदानातील विलंब कमी झाल्याने क्षयरोगाचा संसर्ग रोखण्यासह ग्रामीण आणि वंचित भागांतील नागरिकांना आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

बोगस कागदपत्रांद्वारे एसआयआर ची फसवणूक केल्याचा आरोप; विकसकावर गुन्हा दाखल करण्यासाठी उद्या येरवड्यात निषेध महामोर्चा

जाधवनगरमधील वादग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाला नागरिकांचा विरोध; सर्वेक्षण स्थगित करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : (प्रतिनिधी)

जाधवनगर, येरवडा येथील झोपडपट्टी पुनर्वसन (एसआयआर) प्रकल्पावरून स्थानिक नागरिक आणि अधिकृत झोपडीधारक आक्रमक झाले आहेत. मे. पश्चिम बिल्डर्स या विकसकाने रहिवाशांच्या बनावट संमतीपत्रांसह बोगस कागदपत्रे सादर करून एसआरए प्राधिकरणाची फसवणूक केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकरणी विकसकावर फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि वादग्रस्त प्रकल्प रद्द करावा, या मागणीसाठी बुधवार (४ नोव्हेंबर) रोजी भव्य निषेध महामोर्चा काढण्यात येणार आहे.

दुपारी तीन वाजता गणेशखिंड रोडवरील काकडे मॉल येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे. ज्येष्ठ नेते व माजी नगरसेवक ॲड. आयुबभाई शेख आणि रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी आणि एसआयआर विरोधी कृती समिती, जाधवनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

जाधवनगर येथील सर्व्हे क्रमांक १५०, १५३ ए तसेच सिटी सर्व्हे क्रमांक २७६२/२३, २७६२/२४, २७६२/२६ आणि २७६२/४९ या मिळकतींवर प्रशासनाकडून बुधवारी झोपड्यांचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी पोलिस बंदोबस्तही मागविण्यात आला आहे. मात्र, संमतीपत्रे आणि कागदपत्रांमध्ये कथित बनावटगिरी झाल्याचा आरोप करत नागरिकांनी या सर्वेक्षणालाच विरोध दर्शविला आहे.

या संदर्भात नागरिकांनी एसआयआर चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त यांना निवेदन दिले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करून वादग्रस्त सर्वेक्षण तातडीने स्थगित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. बोगस कागदपत्रे सादर केल्याप्रकरणी विकसकावर एफआयआर दाखल होईपर्यंत आणि प्रकल्प रद्द होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार कृती समितीने व्यक्त केला आहे.

या महामोर्चात ५०० हून अधिक महिला व पुरुष सहभागी होण्याची शक्यता आयोजकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

पशुपालकांना ५०० किलो मका बियाण्याचे मोफत वाटप; १०० शेतकऱ्यांना दिलासा

विवेक वळसे पाटील यांच्या प्रयत्नातून चारा उत्पादन वैरण कार्यक्रम; मुरघास निर्मितीसाठी प्रोत्साहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील पशुपालकांना हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या प्रयत्नातून मोफत मका बियाणे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती आंबेगाव यांच्या पशुसंवर्धन विभागामार्फत सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत हा चारा उत्पादन वैरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

वडगावपीर येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या कार्यक्षेत्रातील लोणी, खडकवाडी, वडगावपीर



आणि मांढळेवाडी या चार गावांतील १०० पशुपालक शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच किलो याप्रमाणे एकूण ५०० किलो मका बियाण्याचे शंभर टक्के अनुदानावर वाटप करण्यात आले. दुष्काळजन्य परिस्थितीत चारा उत्पादनाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. बियाण्यांची पेरणी तातडीने करून मुरघास निर्मितीसाठी चारा उत्पादन घ्यावे, असे आवाहन पशुपालकांना करण्यात आले.

पंचायत समिती सदस्या अंकिता अनिल वाळुंज यांच्या हस्ते बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रेरणा मुळूक, बबन पानसरे, पशुसखी सोनाली खंडागळे, ज्योती वाळुंज, अर्चना रणपिसे, प्रियंका आदक तसेच परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

सध्या जनावरांसाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता हा पशुपालकांसमोरील महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. अशा परिस्थितीत अनुदानावर मका बियाणे उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात चारा उत्पादन घेता येणार आहे. त्यामुळे पशुधनासाठी हिरवा चारा आणि मुरघास उपलब्ध होण्यास मदत होणार असून, पशुपालकांना दिलासा मिळणार आहे.

२०२७ पासून सर्व स्मार्टफोनमध्ये बदलता येणारी बॅटरी अनिवार्य करा

AMCCIE ची केंद्र सरकारकडे मागणी; ग्राहकांना आर्थिक दिलासा, ई-कचरा कमी होण्यासह रोजगारनिर्मितीला चालना मिळणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

स्मार्टफोनची बॅटरी खराब झाल्यानंतर संपूर्ण मोबाइल बदलण्याची वेळ ग्राहकांवर येऊ नये, तसेच वाढत्या इलेक्ट्रॉनिक कचऱ्यावर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी २०२७ पासून भारतात उत्पादित आणि विक्री होणाऱ्या सर्व स्मार्टफोनमध्ये सहज काढता व बदलता येणारी बॅटरी अनिवार्य करावी, अशी मागणी अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

यासंदर्भात AMCCIE चे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे स्वतंत्र राष्ट्रीय धोरण तयार करण्याची मागणी केली आहे.

सध्या बहुतांश स्मार्टफोनमध्ये बॅटरी बदलण्याची प्रक्रिया सामान्य ग्राहकांसाठी सहज शक्य नाही. बॅटरी खराब झाल्यास अधिकृत सर्व्हिस सेंटरमध्ये जाऊन ती बदलावी लागते. त्यासाठी अनेकदा मोठा खर्च करावा लागतो. काही प्रकरणांमध्ये केवळ बॅटरी खराब झाल्यामुळे ग्राहकांना नवीन मोबाइल खरेदी करावा लागतो. परिणामी ग्राहकांचा आर्थिक भार वाढण्याबरोबरच वापरण्यायोग्य मोबाइलही इलेक्ट्रॉनिक कचऱ्यात जमा होण्याचे प्रमाण वाढते.

याबाबत राजेश अग्रवाल म्हणाले, तंत्रज्ञानाचा खरा उद्देश सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ करणे हा असला पाहिजे; अनावश्यक खर्च वाढवणे नव्हे. स्मार्टफोनची केवळ बॅटरी खराब झाली असेल, तर संपूर्ण मोबाइल बदलण्याची वेळ ग्राहकांवर का यावी? बॅटरी बदला, संपूर्ण मोबाइल नाही!



ग्राहकांची बचत आणि रोजगारनिर्मितीवर भर

सहज बदलता येणारी बॅटरी अनिवार्य केल्यास स्मार्टफोनचे आयुष्य वाढण्यास आणि कोट्यवधी ग्राहकांचा अनावश्यक खर्च वाचण्यास मदत होईल, असा अचउउखए चा दावा आहे. त्याचबरोबर मोबाइल रिपेअरिंग सेंटर्स, बॅटरी उत्पादन, सुटे भाग, रिफर्बिशमेंट आणि पुनर्चक्रण उद्योगांना चालना मिळू शकते. या माध्यमातून लघु, सूक्ष्म व मध्यम उद्योगांसाठी (MSME) व्यवसायाच्या नव्या संधी आणि तरुणांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराचे पर्याय निर्माण होऊ शकतात.

केंद्र सरकारकडे सहा प्रमुख मागण्या

AMCCIE ने केंद्र सरकारकडे सहा प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. २०२७ पासून सर्व स्मार्टफोनमध्ये सुरक्षित व सहज बदलता येणारी बॅटरी अनिवार्य करावी, योग्य किमतीत प्रमाणित आणि दर्जेदार रिप्लेसमेंट बॅटरी उपलब्ध करून द्याव्यात, तसेच मोबाइल कंपन्यांना स्पेअर पार्ट्स आणि रिपेअर मॅन्युअल उपलब्ध करून देणे बंधनकारक करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय ग्राहकांच्या हितासाठी 'राइट टू रिपेअर' व्यवस्था अधिक सक्षम करणे, मोबाइल दुरुस्ती, बॅटरी उत्पादन आणि पुनर्चक्रण क्षेत्रातील चऊए उद्योगांना आर्थिक मदत व प्रोत्साहन देणे आणि बॅटरीची सुरक्षितता, गुणवत्ता व पर्यावरण संरक्षणासाठी स्पष्ट राष्ट्रीय मानके निश्चित करणे, या मागण्यांचाही समावेश आहे.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, ग्राहक व्यवहार मंत्रालय तसेच पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांनी संयुक्तपणे या विषयावर व्यापक राष्ट्रीय धोरण तयार करावे, असेही चेंबरने सुचविले आहे.

ही योजना 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय संकल्पनांना बळ देणारी ठरू शकते, असे राजेश अग्रवाल यांनी सांगितले.

AMCCIE चे राष्ट्रीय उपाध्यक्ष नरेंद्र गोयल यांच्यासह कमलराज बन्सल, विनोद सांखला, मनीष तावरावाला, मिठालाल जैन, उमेश मंडोत, जगदीश उनेचा, पंकज करवा, सौ. जयश्री डिंबळे तसेच चेंबरच्या पदाधिकारी व सदस्यांनी या मागणीला पाठिंबा दिला आहे.

भारत-श्रीलंका एनसीसी सायकल मोहिमेची तयारी सुरू; कोल्लममध्ये १३ दिवसांचे संयुक्त प्रशिक्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

कोल्लम (केरळ) : प्रतिनिधी

भारत आणि श्रीलंका यांच्यातील युवकांचे संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या भारत-श्रीलंका राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) सायकल मोहिमेच्या २०२७ मधील आयोजनाची तयारी सुरू झाली आहे. या मोहिमेसाठी दोन्ही देशांच्या एनसीसी कॅडेट्सचे संयुक्त प्रशिक्षण मंगळवार, ३ नोव्हेंबरपासून केरळमधील कोल्लम जिल्ह्यातील करुनागप्पल्ली जवळ असलेल्या वल्लिकावू येथे सुरू झाले.

१ ते १३ नोव्हेंबरदरम्यान चालणाऱ्या या १३ दिवसांच्या प्रशिक्षण उपक्रमातून भारत आणि श्रीलंकेच्या संयुक्त पथकाला आगामी आंतरराष्ट्रीय सायकल मोहिमेसाठी तयार केले जाणार आहे. या मोहिमेचा प्रवास आव्हानात्मक असणार असल्याने कॅडेट्सची शारीरिक क्षमता, सहनशक्ती, शिस्त आणि सामूहिक समन्वय विकसित करण्यावर प्रशिक्षणात भर दिला जाणार आहे.

मात्र, या उपक्रमाचे महत्त्व केवळ सायकल मोहिमेपुरते मर्यादित नाही. दोन शेजारी देशांतील तरुणांना एकत्र आणून परस्पर संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि



आंतरराष्ट्रीय सहकार्याची भावना वाढवणे, हाही या आयोजनामागील महत्त्वाचा उद्देश आहे. संयुक्त प्रशिक्षणादरम्यान दोन्ही देशांतील कॅडेट्सना एकत्र काम करण्याची, एकमेकांच्या अनुभवांतून शिकण्याची आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून युवकांमध्ये नेतृत्वगुण, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजवण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचाच विस्तार म्हणून भारत-श्रीलंका सायकल मोहीम महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, १३ दिवसांच्या प्रशिक्षणानंतर संयुक्त पथक आगामी २०२७ च्या मोहिमेसाठी सज्ज होणार आहे.

या मोहिमेचे नेमके अंतर, मार्ग आणि सहभागी कॅडेट्सची संख्या याबाबतची माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष मोहिमेचे स्वरूप आणि तिचे नियोजन याकडे लक्ष लागले आहे.

सारांश वृत्त

''आई-वडिलांचं प्रेम हा मूलभूत अधिकार''; मुलाच्या कस्टडीबाबत झारखंड हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

■ झारखंड : प्रतिनिधी

''मुलाला आई-वडिलांकडून प्रेम, स्नेह, काळजी, सोबत आणि सुरक्षा मिळणं हे केवळ त्याच्या योग्य संगोपनासाठीच आवश्यक नाही, तर तो एक मूलभूत मानवाधिकार (इरीळल क्रींरप ठळसहीं) देखील आहे'' असं झारखंड हायकोर्टाने स्पष्ट केलं. तसेच मुलाला आईकडे ठेवण्याच्या फॅमिली कोर्टाचा निर्णय कायम ठेवताना सुजित नारायण प्रसाद आणि अखिल कुमार यांनी सध्याच्या व्यवस्थेत बदल केल्यास मुलाच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो असं म्हटलं आहे. २०१६ मध्ये लग्न झालेल्या या जोडप्याने त्यांचं वैवाहिक जीवन उत्तम असल्याचं सांगितलं होतं. २०२१ मध्ये त्यांना एक मुलगा झाला. पतीने दावा केला की, पत्नीने कोणत्याही ठोस कारणाशिवाय त्याला सोडलं आणि ऑगस्ट २०२३ मध्ये ती सर्व सामान व मुलाला घेऊन माहेरी निघून गेली. पतीने असाही दावा केला की, तो आपल्या पत्नी आणि मुलावर प्रचंड प्रेम करतो आणि त्याने नेहमीच त्यांना पूर्ण वेळ, प्रेम दिलं आणि काळजी घेतली आहे. पतीने आरोप केला की, पत्नीने त्याला सोडलं आहे आणि मुलाला भेटण्यापासूनही रोखलं आहे. आपण पत्नी व मुलाच्या खाण्या-पिण्याचया, कपड्यांच्या, राहण्याच्या आणि शिक्षणाचा सर्व खर्च उचलत असून आजही त्यांना सोबत ठेवण्यास तयार असल्याचा दावा त्याने केला. याच दरम्यान, त्याने मुलाच्या तात्पुरत्या कस्टडीसाठी फॅमिली कोर्टात धाव घेतली होती.

एव्हरेस्ट बेस कॅम्पजवळ दोन हेलिकॉप्टरची धडक; भारतीय पर्यटकाचा मृत्यू, न्यूझीलंडचा नागरिक जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

काठमांडू : प्रतिनिधी

नेपाळमधील जगप्रसिद्ध माउंट एव्हरेस्ट परिसरात मंगळवारी, ३ नोव्हेंबर रोजी दोन हेलिकॉप्टरची एकमेकांना धडक बसून भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत एका भारतीय पर्यटकाचा मृत्यू झाला असून न्यूझीलंडचा एक नागरिक जखमी झाला आहे. अपघातानंतर जखमी नागरिकाची सुटका करण्यात आल्याची माहिती नेपाळमधील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, एव्हरेस्ट बेस कॅम्प परिसरात दोन्ही हेलिकॉप्टर उतरण्याच्या तयारीत असताना ही धडक झाली. सोलुखुंबू जिल्ह्याचे मुख्य जिल्हाधिकारी कमान



सिंह थापा मगर यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे.

या अपघातात फिशटेल एअर आणि डायनेस्टी एअर या दोन खासगी कंपन्यांच्या हेलिकॉप्टरचा समावेश होता. फिशटेल एअरने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये एव्हरेस्ट परिसरातून सुरक्षित बाहेर काढण्यात आलेले पर्यटक प्रवास करत होते. लँडिंगदरम्यान हेलिकॉप्टरचा अपघात झाला. त्यामध्ये भारतीय आणि न्यूझीलंडचे नागरिक पर्यटक म्हणून प्रवास करत होते. दुसरीकडे, डायनेस्टी एअरच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये केवळ मालवाहतूक केली जात होती. या दोन हेलिकॉप्टरची धडक नेमकी कशी झाली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अपघाताच्या कारणांचा तपास होण्याची शक्यता आहे.


ओमानच्या समुद्रात भारतीय जहाजावर हल्ला; गुजरातच्या खलाशाचा मृत्यू, १३ जणांची सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

दिल्ली : प्रतिनिधी

ओमानच्या समुद्रकिनाऱ्याजवळ एका व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्यात भारतीय खलाशाचा मृत्यू झाला असून, जहाजावरील अन्य १३ भारतीय नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी, ३ नोव्हेंबर रोजी या घटनेला दुजोरा दिला. या हल्ल्यामुळे पश्चिम आशियातील सागरी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी, २ नोव्हेंबर रोजी ओमानमधील लिमाह परिसरानजीक एमएसव्ही अल जुसुफी या व्यापारी जहाजावर हल्ला झाला. या घटनेत गुजरातमधील गांधार नहीम अजीज या भारतीय खलाशाचा मृत्यू झाला. जहाजावर एकूण १४ भारतीय नागरिक होते. त्यापैकी १३ जणांची सुटका



करण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

मात्र, या हल्ल्यामागे नेमके कोण होते, हल्ला कोणत्या प्रकारे करण्यात आला आणि जहाजाला लक्ष्य करण्यामागील कारण काय होते, याबाबतची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या घटनेच्या चौकशीसह सागरी मार्गांवरील सुरक्षेचा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे.

विशेष म्हणजे, ओमानचा परिसर आणि होर्मुझची सामुद्रधुनी हा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि ऊर्जा वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा सागरी पट्टा आहे. या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर तेल आणि व्यापारी मालाची वाहतूक होते. त्यामुळे या भागातील संघर्षाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित राहत नाही, तर जागतिक व्यापार आणि जहाज वाहतुकीवरही होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर भारताने पश्चिम आशियातील वाढत्या तणावाबाबत चिंता व्यक्त केली असून, संबंधित सर्व पक्षांना तातडीने तणाव कमी करण्याचे आवाहन केले आहे.

एका भारतीय नागरिकाचा मृत्यू आणि अन्य १३ जणांची सुटका या घटनेने भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा अधोरेखित केला आहे. आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांवरील वाढता धोका लक्षात घेता, व्यापारी जहाजांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे.

प्रादेशिक शस्त्रनियंत्रणाच्या ठरावाला भारताचा विरोध; संयुक्त राष्ट्रांत इस्रायलसोबतच मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

संयुक्त राष्ट्रे :प्रतिनिधी

प्रादेशिक आणि उपप्रादेशिक स्तरावर पारंपरिक शस्त्रास्त्रांवर नियंत्रण आणण्यासंदर्भातील संयुक्त राष्ट्रांच्या ठरावाला भारताने विरोध दर्शवला आहे. या मतदानात भारतासोबत इस्रायलनेही ठरावाच्या विरोधात मत नोंदवले. पाकिस्तान आणि बेलारूस यांनी मांडलेल्या या मसुद्याला १९३ सदस्यीय संयुक्त राष्ट्र महासभेच्या प्रथम समितीत मोठे समर्थन मिळाले असताना भारताची भूमिका आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेचा विषय ठरली आहे.

'सर्वसाधारण आणि संपूर्ण निःशस्त्रीकरण : प्रादेशिक आणि उपप्रादेशिक स्तरावरील पारंपरिक शस्त्रनियंत्रण' या शीर्षकाचा हा ठराव २ नोव्हेंबर २०२६ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेच्या प्रथम समितीत मतदानासाठी ठेवण्यात आला होता. या प्रस्तावाच्या बाजूने १८० देशांनी मतदान केले, तर भारत आणि इस्रायल या दोन देशांनी विरोधात मतदान केले. विशेष म्हणजे, मतदानात एकाही देशाने तटस्थ भूमिका घेतली नाही.

भारताने या ठरावाला विरोध करण्यामागील भूमिका स्पष्ट करताना राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. देशांच्या सुरक्षाविषयक चिंता केवळ त्यांच्या भौगोलिक प्रदेशापुरत्या मर्यादित नसतात. त्यामुळे शस्त्रनियंत्रणासाठी प्रादेशिक चौकटीवर आधारित दृष्टिकोन पुरेसा ठरू शकत नाही, असे भारताचे म्हणणे आहे. या ठरावाचा प्रस्ताव पाकिस्तान आणि बेलारूस यांनी मांडला होता. प्रादेशिक पातळीवर पारंपरिक शस्त्रास्त्रांवर नियंत्रण आणणे आणि शस्त्रस्पर्धा मर्यादित ठेवणे हा अशा प्रस्तावांचा व्यापक उद्देश आहे. मात्र, भारताने त्यातील प्रादेशिक चौकटीवर आक्षेप घेतला आहे. भारताच्या या भूमिकेमुळे शस्त्रनियंत्रण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या प्राधान्यांमधील संघर्ष पुन्हा अधोरेखित झाला आहे. एकीकडे १८० देशांनी ठरावाला पाठिंबा दिला, तर दुसरीकडे भारताने सार्वभौम सुरक्षाविषयक चिंतांना प्राधान्य देत विरोधाची भूमिका कायम ठेवली. त्यामुळे आगामी संयुक्त राष्ट्र चर्चेत या मुद्द्यावर भारताची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

टीका करणाऱ्यांनी ऐकून घ्या! गरज पडली तर १०० वेळा रॅम्प वॉक करेन!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

रॅम्प वॉकवरून टीका करणाऱ्यांनी कितीही आवाज उठवला तरी आपण मागे हटणार नाही, असा आक्रमक पवित्रा मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला आहे. जालन्यातील ग्रामीण महिलांच्या हाताला रोजगार मिळावा आणि त्यांच्या सिल्क साड्यांना देशभर बाजारपेठ मिळावी, यासाठी पुन्हा रॅम्प वॉक करावा लागला तर शंभर वेळा करेन, असा थेट इशाराच त्यांनी विरोधकांना दिला.

जालना दौऱ्यादरम्यान माध्यमांशी बोलताना त्यांनी 'बॉम्बे टाइम्स फॅशन वीक'मधील सहभागावरून सुरू असलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. आपण एका २४ वर्षांच्या मुलाची आई असून गेली २२ वर्षे राजकारणात सक्रिय आहोत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करताना तेथील महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

फॅशन वीकमध्ये जालन्यातील महिलांनी तयार केलेल्या सिल्क साड्यांचा



स्टॉल होता. त्या साड्यांना मुंबईसह मोठ्या बाजारपेठेत ओळख मिळावी, या उद्देशाने आपण रॅम्प वॉक केला. यात वैयक्तिक हौस किंवा प्रसिद्धीचा हेतू नव्हता, असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण महिलेने तयार केलेली साडी मुंबईतील महिला विकत घेत असेल आणि त्यातून मिळणारा पैसा ग्रामीण महिलेच्या खिशात जात असेल, तर अशा कामासाठी पुन्हा रॅम्प वॉक करायला आपण तयार असल्याचे त्या म्हणाल्या.

दरम्यान, जालना दौऱ्यात दुष्काळी परिस्थितीचा आढावा, पाणीप्रश्न आणि जिल्हा नियोजन समितीची बैठक होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. जालना आणि बीड ही सिल्क निर्मितीत राज्यातील आघाडीची शहरे असल्याचा दावाही त्यांनी केला.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील पराभवावर बोलताना सतीश चव्हाण यांना मिळालेल्या मतांमध्ये खरे विश्वासदर्शक आपणच असल्याचे सूचक विधान त्यांनी केले.

रॅम्प वॉकवरून राजकीय वाद रंगला असला, तरी ग्रामीण महिलांना प्रत्यक्ष किती रोजगार मिळतो, हेच या उपक्रमाचे खरे यश ठरणार आहे.

४७ लाखांचा हनीट्रॅप! बीडच्या प्रतिष्ठित व्यापाऱ्याची अब्रूच्या भीतीने लूट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बीड/ प्रतिनिधी

मोबाईलवरील अनोळखी मैत्री किती महागात पडू शकते, याचा धक्कादायक नमुना बीडमध्ये समोर आला आहे. सोशल मीडियावरील खासगी व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत एका ३६ वर्षीय प्रतिष्ठित व्यापाऱ्याला तब्बल ४७ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे बीडच्या व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली असून, एवढी मोठी रक्कम गमावणारा व्यापारी नेमका कोण, याची चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यापाऱ्याची 'टँगो' या व्हिडीओ कॉलिंग ॲपवर दोन तरुणींशी ओळख झाली. संभाषण वाढल्यानंतर व्हिडीओ कॉलदरम्यान व्यापाऱ्याचा खासगी व्हिडीओ स्क्रीन रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर हा व्हिडीओ सोशल मीडियावर तसेच नातेवाईकांमध्ये प्रसारित करण्याची धमकी देत पैशांची मागणी सुरू झाली.

बदनामीच्या भीतीने व्यापाऱ्याने सुरुवातीला पैसे दिले. मात्र, एकदा पैसे मिळाल्यानंतर ब्लॅकमेलिंग थांबण्याऐवजी वाढतच गेले. वेगवेगळ्या वेळी पैसे उकळण्यात आले आणि एकूण रक्कम ४७ लाख रुपयांवर पोहोचल्याचा आरोप आहे.

अखेर सततच्या धमक्यांना कंटाळून व्यापाऱ्याने पुराव्यांसह पोलिसांकडे धाव घेतली. बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात प्रिया देवी प्रसाद आणि तमन्ना रावत या दोन नेपाळी तरुणींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामागे मोठे आंतरराष्ट्रीय सायबर ब्लॅकमेलिंग जाळे असण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. मात्र, त्याची अधिकृत पुष्टी तपासातूनच होणार आहे.

प्रदूषण रोखण्याचा संदेश दिला म्हणून दिया मिर्झा 'हिंदूविरोधी'? भाजप नेत्यांना देशाच्या प्रश्नांपेक्षा धर्माचाच पुळका का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशात महागाई असो, बेरोजगारी असो, प्रदूषण असो किंवा सामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्न असोत, या मुद्द्यांवर राजकीय पक्षांकडून किती गांभीर्याने चर्चा होते, हा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. मात्र, एखाद्या अभिनेत्रीने दिवाळीत सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडू नका, प्रदूषण टाळा, असा साधा आणि सामाजिक हिताचा संदेश दिला की त्यातही धर्म शोधण्याची घाई काही राजकीय नेत्यांना होते. अभिनेत्री दिया मिर्झाच्या बाबतीत नेमके हेच घडले. आणि अखेर मुंबई उच्च न्यायालयाला या राजकीय प्रतिक्रियांवर नाराजी व्यक्त करत भारत धर्मनिरपेक्ष देश असल्याची आठवण करून द्यावी लागली.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यासंदर्भात न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची जनजागृती करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिया मिर्झाची मदत घेतली होती. त्यानुसार तिने नागरिकांना सार्वजनिक रस्त्यांवर फटाके न फोडण्याचे आणि वायुप्रदूषण टाळण्याचे



आवाहन करणारा व्हिडिओ तयार केला. मात्र, काही भाजप नेत्यांनी या व्हिडिओवर आक्षेप घेत तिला 'हिंदूविरोधी' ठरवले. या विरोधानंतर बीएमसीच्या सोशल मीडिया खात्यावरून व्हिडिओ हटवण्यात आला.

म्हणजे प्रदूषण कमी करण्याचा संदेश देणाऱ्या अभिनेत्रीची जात, धर्म किंवा श्रद्धा तपासण्याची गरज काही नेत्यांना वाटली; पण प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची चिंता किती वाटली, हा खरा प्रश्न आहे.

या प्रकरणाची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने भाजप नेत्यांच्या वक्तव्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. एखादी व्यक्ती दुसऱ्या धर्माची आहे म्हणून तिला एखाद्या सणाच्या उत्सवात सहभागी होण्यापासून रोखण्याचा अधिकार कोणाला दिला? सण हा प्रत्येकासाठी असतो. देशातील कोणत्याही व्यक्तीला कोणताही सण साजरा करण्यापासून वेगळे ठेवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण सवाल न्यायालयाने उपस्थित केला.

न्यायालयाने दिया मिर्झाने दिलेला संदेश चांगला असल्याचे नमूद केले. प्रदूषणाविषयी जनजागृती करण्यासाठी तिने न्यायालयाच्या निर्देशांनुसार काम केले होते. त्यामुळे तिच्याविरोधात झालेल्या टिप्पण्या दुर्दैवी असल्याचेही खंडपीठाने म्हटले. न्यायालयाच्या आधीच्या आदेशात या जनजागृती उपक्रमात सर्वांना सहभागी होण्याची मुभा असताना राजकीय नेत्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचेही न्यायालयाने निदर्शनास आणले. याचवेळी बीएमसीला हटवलेला व्हिडिओ पुन्हा प्रसारित करण्याचे आदेश देण्यात आले.

या सुनावणीने एक मूलभूत प्रश्न पुन्हा समोर आणला आहे. देशात प्रदूषण वाढत आहे, शहरांमधील हवेची गुणवत्ता ढासळत आहे, आरोग्यव्यवस्थेवर ताण आहे, बेरोजगारी आणि महागाईचे प्रश्न नागरिकांना भेडसावत आहेत. अशा वेळी राजकीय नेतृत्वाने या प्रश्नांवर ठोस उपाययोजना, जबाबदारी आणि उत्तरदायित्व यांची चर्चा करणे अपेक्षित नाही का? नागरिकांना स्वच्छ हवा मिळावी, यासाठी एखाद्याने आवाहन केले तर त्याच्या संदेशातील वैज्ञानिक आणि सामाजिक तथ्य तपासण्याऐवजी त्याच्या धर्मावरून राजकीय वाद निर्माण करणे कितपत योग्य आहे?